दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २९ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १५७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

रविवार दि. १ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष, त्रयोदशी संध्याकाळी ७-१० पर्यंत
दिवस नक्षत्र-पुष्य सकाळी ८-३४ पर्यंत नंतर आश्लेषा, योग- शोभन दुपारी २-३३ पर्यंत
चंद्र रास- कर्क, सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

### डेंग्यूची भीती कमी होणार!

**दिल्ली** : देशातील वाढत्या डेंग्यू रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर भारताची पहिली स्वदेशी लस अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. दिल्लीस्थित कंपनीच्या सहकार्याने ही टेट्राव्हॅलंट लस विकसित करत आहे. १० हजारांहून अधिक स्वयंसेवकांवर तिसऱ्या टप्प्याच्या चाचण्या सुरू असून २०२७ च्या सुरुवातीला लस उपलब्ध होण्याची शक्यता आहे. एकदाच घ्यायच्या या लसीमुळे डेंग्यूचा संसर्ग टळेल किंवा झाल्यास तो गंभीर होणार नाही, असा दावा संशोधकांचा आहे.

## सारांश वृत्त

### चेक बाउन्स प्रकरणावर राजपाल यादवची प्रतिक्रिया

**पुणे :** बॉलिवूडचा विनोदी अभिनेता राजपाल यादव याने 9 कोटींच्या चेक बाउन्स प्रकरणात तुरुंगवास भोगल्यानंतर मुंबईत पत्रकार परिषद घेत आपली बाजू मांडली. उद्योगपती माधव गोपाल अग्रवाल यांनी 'आता पता लपता' चित्रपटासाठी 5 कोटींची गुंतवणूक केल्याचे त्याने सांगितले. चित्रपटाच्या निर्मितीत मोठा खर्च झाल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या, असे तो म्हणाला.

### रणजी ट्रॉफी 2025-26 : जम्मू-काश्मीरचा ऐतिहासिक विजय

**मुंबई :** रणजी ट्रॉफी २०२५-२६ च्या अंतिम सामन्यात जम्मू-काश्मीर संघाने कर्नाटक वर शानदार विजय मिळवत 67 वर्षांनंतर जेतेपद पटकावले. प्रथमच फायनलमध्ये पोहोचलेल्या जम्मू-काश्मीरने दोन्ही डावांत दमदार फलंदाजी करत प्रतिस्पर्ध्याला एकदाच फलंदाजीची संधी दिली. ऐतिहासिक यशानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी संघाचे अभिनंदन करत खेळाडूंना विशेष बक्षीस जाहीर केले.

### अहिल्यानगरमध्ये अज्ञात आजाराने ३० गाई दगावल्या

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर व पारनेर तालुक्यातील काही गावांमध्ये गेल्या १५ दिवसात ३० गाई अज्ञात आजारामुळे मृत्युमुखी पडल्या आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. पशुवैद्यकीय विभागाचे पथक मृत गाईंची तपासणीसाठी नमुने प्रयोगशाळेत पाठवत आहे, मात्र आजाराचे निदान अद्याप स्पष्ट झालेले नाही. या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते व आदर्शगाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### कमी दृश्यमानतेत लँडिंगचा प्रयत्न; विमान प्रथम झाडांना धडकले, नंतर जमिनीवर आदळून भीषण आग

# 'दादांच्या' विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल जाहीर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात हवाई उड्डाण मंत्रालयाच्या एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (AAIB) चा २२ पानी प्राथमिक अहवाल समोर आला आहे. २८ जानेवारी रोजी झालेल्या या दुर्घटनेत अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला होता. अहवालात कमी दृश्यमानतेत व्हीएफआर (Visual Flight Rules) नियमांचे संभाव्य उल्लंघन, तसेच अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील गंभीर सुरक्षा त्रुटी याकडे स्पष्टपणे बोट ठेवण्यात आले आहे.

मुंबईहून बारामतीकडे निघालेल्या नॉन-शेड्युल्ड/व्हीआयपी फ्लाइटने रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न केला.



पहिल्या प्रयत्नात 'गो अराउंड' करण्यात आले. दुसऱ्या प्रयत्नावेळी पायलटने लँडिंगसाठी तयारी दर्शवली. मात्र, एटीसीने त्या वेळी दृश्यमानता केवळ ३ किलोमीटर असल्याची माहिती दिली होती, जी व्हीएफआर अंतर्गत आवश्यक ५ किलोमीटरपेक्षा कमी होती. तरीही विमानाने लँडिंगची प्रक्रिया सुरू ठेवली.

अहवालानुसार, लँडिंग क्लिअरन्स मिळाल्यानंतर काही क्षणांतच विमान रनवेच्या डावीकडे सुमारे ५० मीटर अंतरावर असलेल्या झाडांना धडकले. त्यानंतर विमान जमिनीवर कोसळले आणि भीषण आग लागून पूर्णतः जळून खाक झाले. कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (CVR) मधील प्राथमिक माहितीनुसार, लँडिंगदरम्यान "ओह शीट, ओह शीट" असे शब्द ऐकू आले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्राथमिक निष्कर्षांमध्ये कमी दृश्यमानतेत लँडिंगचा प्रयत्न, अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील ऑपरेशन, हवामान आणि मूलभूत नेव्हिगेशन सहाय्यांतील कमतरता, तसेच एअरफिल्ड सुविधांचे अपुरे मानक यांचा उल्लेख आहे. बारामती विमानतळावर अधिकृत एटीसी नियंत्रण सुविधा नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. उपग्रह चित्रांनुसार परिसरात हलके धुके होते, तर पुणे व मुंबई येथेही २००० ते २५०० मीटर इतकीच दृश्यमानता नोंदवली गेली होती. विमानतळावरील सुरक्षा विषयक त्रुटीही अहवालात अधोरेखित करण्यात आल्या आहेत. रनवेवरील मार्किंग स्पष्टपणे दिसत नव्हते, रनवेवर बारीक खडी आढळली, तसेच संपूर्ण परिसराला परिपूर्ण कुंपण नव्हते. अग्निशमन सुविधांचा अभावही गंभीर मानला गेला आहे. दरम्यान, फ्लाइट डेटा रेकॉर्डर (FDR) चे विश्लेषण सुरू असून, सीव्हीआरमधील संपूर्ण डेटा पुनर्प्राप्त झाल्यानंतर अंतिम अहवाल जाहीर केला जाणार आहे. विशेष म्हणजे, दोन्ही पायलटांनी मद्यपान केले नव्हते, असेही तपासात स्पष्ट झाले आहे.

#### नव्या मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा होण्याची अपेक्षा

● या प्राथमिक निष्कर्षांनंतर अनकंट्रोल्ड विमानतळांवरील उड्डाण नियम आणि सुरक्षा मानकांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विमान सुरक्षा नियम अधिक कठोर करण्यासंदर्भात लवकरच नव्या मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा होण्याची अपेक्षा आहे.

## ठोंबरे-मिटकरींचे प्राथमिक अहवालावर गंभीर आरोप!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत जाहीर झालेल्या प्राथमिक अहवालावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे आणि आमदार अमोल मिटकरी यांनी तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. ब्लॅक बॉक्स अतिउष्णतेमुळे खराब झाल्याचा दावा पटण्यासारखा नसल्याचे सांगत दोघांनीही घातपाताची शक्यता व्यक्त केली आहे. ठोंबरे म्हणाल्या की, अतिउष्णतेमुळे ब्लॅक बॉक्स नष्ट झाला, हा दावा मान्य करणे कठीण आहे. असे उपकरण अत्यंत तापमान आणि दाब सहन करण्यासाठी बनवलेले असते. त्यामुळे प्राथमिक अहवालाद्वारे कुठेतरी वेगळे चित्र उभे करण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली. काही अन्य यंत्रणांकडून वेगळी माहिती मिळाल्याचा दावा करत, सत्य लपवले जात असेल तर त्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर असेल, असा इशारा त्यांनी दिला. मिटकरी यांनीही टेल सेक्शनमध्ये असलेला डेटा रेकॉर्डर इतक्या सहज जळू शकत नाही, असे नमूद केले.

विमानतज्ज्ञांचे मत आणि काही सार्वजनिक विधानांचा उल्लेख करत त्यांनी घातपाताची शक्यता शंभर टक्के असल्याचा दावा केला. काही व्यक्तींच्या ठावठिकाण्याबाबत प्रश्न उपस्थित करत त्यांनी संबंधित यंत्रणांकडून स्पष्ट उत्तरे मागितली. सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य पुरावे सार्वजनिक का केले जात नाहीत, असा सवालही करण्यात आला.

## प्लास्टिक फुलांवरील बंदी अधिक कठोर; नवा जीआर लवकरच!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात नैसर्गिकरित्या विघटन न होणाऱ्या प्लास्टिक फुलांच्या विक्रीवर आधीपासूनच बंदी असली तरी तिची अंमलबजावणी अधिक प्रभावी आणि कठोर करण्यासाठी लवकरच स्वतंत्र शासन निर्णय (जीआर) काढण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. नव्या जीआरमध्ये केवळ उत्पादन व विक्री करणाऱ्यांवरच नव्हे, तर सजावटीसाठी प्लास्टिक फुले वापरणाऱ्या डेकोरेटर आणि अशा सजावटीला परवानगी देणाऱ्या मोठ्या मॅरेज हॉल मालकांवरही कारवाईची स्पष्ट तरतूद असेल, असे त्यांनी सांगितले.

भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी बाजारात वाढत्या प्लास्टिक फुलांच्या तसेच कमी दर्जाच्या प्लास्टिक खेळण्यांच्या वापराबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सध्या कृत्रिम फुलांची विक्री अक्षरशः वाढली असून खरी आणि प्लास्टिक फुले यातील फरक ओळखणेही कठीण झाले आहे. विघटन न होणाऱ्या या फुलांमुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून नैसर्गिक फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, प्लास्टिक बंदीचा जीआर अस्तित्वात असतानाही अनेक महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा मुद्दा भाजप आमदार प्रवीण दटके यांनी उपस्थित केला. स्थानिक स्वराज्य संस्थांतील अधिकारी नियमांचे पालन करत नसतील, तर त्यांच्यावर कोणती कारवाई होणार याचाही स्पष्ट उल्लेख नव्या जीआरमध्ये करावा, अशी मागणी त्यांनी केली.

### इमारत क्षणात कोसळली; सहा गंभीर जखमी, चौकशीचे आदेश

# फटाका कारखान्यात भीषण स्फोट; १८ जणांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काकीनाडा (आंध्र प्रदेश) :** काकीनाडा जिल्ह्यातील सामरलकोट मंडलमधील वेटलापालेम गावात फटाका निर्मिती कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात किमान १८ जणांचा जळून मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. स्फोटाच्या वेळी कारखान्यात सुमारे ३० कामगार उपस्थित होते, अशी प्राथमिक माहिती प्रशासनाने दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काही महिला कामगार स्फोटक साहित्य तयार करत असताना अचानक प्रचंड स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की संपूर्ण इमारत काही क्षणांत कोसळली. अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त होत असून अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके युद्धपातळीवर शोध व बचावकार्य करत आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, स्फोटाचा धक्का इतका जबरदस्त होता की काही मृतदेह शेजारच्या शेतात जाऊन पडले. स्फोटानंतर काही तास अधूनमधून लहानमोठे स्फोट होत राहिल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले. दाट धुरामुळे आसपासच्या किमान पाच गावांवर परिणाम झाला असून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी अधिकाऱ्यांशी तातडीची बैठक घेऊन मदतकार्य गतीने राबवण्याचे आणि जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार देण्याचे निर्देश दिले. राज्याच्या गृहमंत्री वांगलापुडी अनीता घटनास्थळी रवाना झाल्या असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. जखमींवर जवळच्या शासकीय आणि खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, दुर्घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. संबंधित कारखान्याकडे वैध परवाना होता का, तसेच स्फोटक साठवणूक आणि उत्पादन प्रक्रियेदरम्यान सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का, याची तपासणी प्रशासनाकडून केली जात आहे. या भागात यापूर्वीही अशा प्रकारच्या दुर्घटना घडल्याची नोंद असून, सुरक्षाव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही घटना औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीने धोक्याची घंटा ठरत असून, अशा कारखान्यांवरील देखरेख आणि नियमांची अंमलबजावणी अधिक कठोर करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्षांना पर्यावरणस्नेही होळीच्या शुभेच्छा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** होळी, धुलिवंदन आणि रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर राज्यात पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश देत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पर्यावरणस्नेही होळीच्या शुभेच्छा दिल्या. विधानभवनात भेट घेऊन त्यांनी नैसर्गिक व पर्यावरणपूरक पाच रंगांचा समावेश असलेले विशेष पॅकेट देत 'हरित होळी'चा संदेश दिला.



राज्यात होळी, धुलिवंदन आणि रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. मात्र रासायनिक रंगांमुळे त्वचारोग, पाण्याचे प्रदूषण आणि पर्यावरणीय हानी होत असल्याची बाब लक्षात घेऊन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने यंदा नैसर्गिक रंगांच्या वापरावर भर दिला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सहकार्याने नागरिकांना पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

याच उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे यांनी राज्यातील नागरिकांना रासायनिक रंगांना नकार देत फुलांपासून, हळदीपासून, औषधी वनस्पतींपासून तयार केलेले नैसर्गिक रंग वापरण्याचे आवाहन केले. "होळीचा आनंद साजरा करताना पर्यावरणाचे भान राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सण साजरा करण्याबरोबरच वसुंधरेचे रक्षण करण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा," असे त्या म्हणाल्या.

### एअर इंडियाची उड्डाणे तात्पुरती रद्द



**पुणे :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडियाने दुबई, अबू धाबी, दोहा, रियाद, जेद्दा, दम्माम, मस्कट आणि तेलअविव येथील उड्डाणे तात्पुरती रद्द केली आहेत. ऑपरेशन रायझिंग लायनमुळे सुरक्षेचा धोका वाढल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पुढील आदेश येईपर्यंत सेवा बंद राहणार असून, तिकीटधारकांना पर्यायी व्यवस्था किंवा परतावा देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## सुनेत्रा पवारांच्या खात्यांची उत्तरं मुश्रीफ व भरणे देणार

### अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री स्वतः उत्तर देणार नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या खात्यांबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. त्यांच्या ताब्यात असलेल्या तीनपैकी एकाही खात्याची उत्तरे त्या स्वतः सभागृहात देणार नसून संबंधित प्रश्नांची जबाबदारी इतर मंत्र्यांवर सोपवण्यात आली आहे.

क्रीडा व युवा कल्याण तसेच अल्पसंख्याक विभागाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे मंत्री दत्तात्रय भरणे देणार आहेत. तर राज्य उत्पादन शुल्क खात्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरे मंत्री हसन मुश्रीफ सभागृहात मांडतील. या निर्णयामुळे अधिवेशनात राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातातील निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यसभेच्या खासदारपदावर असलेल्या सुनेत्रा पवार यांचं हे पहिलंच विधिमंडळ अधिवेशन असल्याने त्या सभागृहात काय भूमिका मांडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र त्यांच्या खात्यांवरील प्रश्नांची उत्तरे इतर मंत्र्यांकडे देण्यात आल्याने त्या सभागृहात बोलण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत मिळत आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या ताब्यातील क्रीडा व युवा कल्याण, अल्पसंख्याक तसेच राज्य उत्पादन शुल्क ही खाती सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली. तर अर्थखात्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे घेतली आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदीही निवड करण्यात आली असून त्यांच्या राज्यसभेतील जागेवर पार्थ पवार यांना पाठवण्याची तयारी सुरू असल्याची माहिती आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री स्वतः उत्तर देणार नसल्याने विरोधकांकडून प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर सरकारची पुढील भूमिका काय असेल, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### विकासकामांना १,१८६ कोटींची तरतूद; पाणी, भूसंपादन, स्मार्ट सिटी व सामाजिक योजनांना प्राधान्य

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचा ५,६६० कोटींचा अर्थसंकल्प सादर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महापालिकेच्या सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५ हजार ६६० कोटी ७३ लाख रुपयांचे (आरंभीच्या शिल्लकेसह) अंदाजपत्रक आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांचेकडे सादर केले. केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांसह हा अर्थसंकल्प ९ हजार ३२२ कोटी १७ लाख रुपयांचा आहे. मार्च २०२७ अखेर ५ कोटी रुपयांची शिल्लक राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला.

आयुक्त हर्डीकर यांनी सांगितले की, नागरिक सहभाग



उपक्रमातून यंदा सुमारे ४,९९६ सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी २९७ सूचनांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला असून हे लोकाभिमुख प्रशासनाचे प्रतीक आहे.

#### क्षेत्रीय विकासासाठी भरीव निधी

अ ते ह प्रभागांसाठी अनुक्रमे ६.२९ कोटी, ११.४९ कोटी, १०.२५ कोटी, ११.४४ कोटी, ३.७० कोटी, ९.३० कोटी, ५.२८ कोटी व ७.९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. स्थानिक पातळीवरील रस्ते, पायाभूत सुविधा व नागरी सोयीसुविधांना यामुळे गती मिळणार आहे.

#### अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

महापालिकेच्या विकासकामांसाठी एकूण १,१८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. स्थापत्य विशेष योजनांसाठी ४३६.९४ कोटी, महापौर निधीसाठी ५० कोटी, शहरी गरीबांसाठी (BSUP) १,९५३ कोटी, महिलांसाठी जेंडर बजेटअंतर्गत ९९ कोटी, दिव्यांग कल्याणासाठी ६८.३० कोटी, पाणीपुरवठ्यासाठी १५५.७३ कोटी, पीएमपीएमएलसाठी ४०० कोटी, भूसंपादनासाठी १०० कोटी, अतिक्रमण निर्मूलनासाठी १० कोटी, स्मार्ट सिटीसाठी ५० कोटी आणि अमृत २.० योजनेसाठी ५४.४५ कोटी रुपयांची तरतूद आहे.

#### महत्त्वाचे प्रकल्प

नवीन प्रशासकीय इमारत, पिंपरी डेअरी फार्म उड्डाणपूल, मोशी रुग्णालय, थेरगाव कर्करोग रुग्णालय (PPP), अग्निशमन प्रबोधिनी, मामुर्डी-सांगवडे पूल, ड्रेनेज मास्टर प्लॅन, सिटी सेंटर, अण्णासाहेब मगर स्टेडियम, हरित सेतू, टेल्को रोड NMT, भामा आसखेड जॅकवेल (अमृत २.०), प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प, वाकड येथे आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन कोर्ट, बायोडायव्हर्सिटी पार्क, मुळा व इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन, मोशी कचरा डेपो बायोगॅस प्रकल्प, सांडपाणी पुनर्वापर व एकात्मिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प यांना गती दिली जाणार आहे.

#### विभागनिहाय भांडवली खर्च

स्थापत्य विभागासाठी ७२७.९२ कोटी, भूसंपादनासाठी १०० कोटी, विद्युत विभागासाठी ३२.७८ कोटी, पाणीपुरवठ्यासाठी १५५.७३ कोटी, जलनिस्सारणासाठी १८.२६ कोटी, पर्यावरणासाठी २४.३५ कोटी आणि 'प' अंदाजपत्रकांतर्गत ३४.१० कोटी रुपयांची तरतूद आहे.

हा अर्थसंकल्प शहराच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाचा आराखडा असून सामाजिक न्याय, पायाभूत सुविधा आणि पर्यावरणीय संतुलन यांना प्राधान्य देणारा असल्याचा विश्वास आयुक्त हर्डीकर यांनी व्यक्त केला.

## ऑनलाईन फूड डिलिव्हरी कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी सक्तीची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात ऑनलाईन खाद्यपदार्थ वितरण करणाऱ्या कंपन्यांना यापुढे वितरण कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी बंधनकारक राहणार आहे. हा नियम न पाळणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत दिला. प्रश्नोत्तराच्या तासात भाजप आमदार भीमराव तापकीर यांनी हा मुद्दा उपस्थित केला. राज्यातील झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट, झेप्टो, अमेझॉन आदी ऑनलाईन वितरण कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी सक्तीची करण्याबाबत शासन परिपत्रक काढणार का, तसेच पडताळणी न करता कर्मचारी ठेवणाऱ्या कंपन्यांवर दंडात्मक कारवाई होणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ग्राहकांना ॲपवर वितरण कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी विचारणा केली.

उत्तर देताना मंत्री फुंडकर म्हणाले की, ऑनलाईन वितरण कंपन्यांकडून कर्मचाऱ्यांची नोंदणी बहुतांश वेळा त्रयस्थ संस्थांमार्फत केली जाते. पार्टनरशिपच्या नावाखाली करार होत असल्याने कंपन्या थेट जबाबदारी टाळताना दिसतात. मात्र अलीकडील काही घटनांच्या पार्श्वभूमीवर गृह विभागाकडून सूचना मागवण्यात आल्या असून चारित्र्य तपासणीबाबत कामगार विभागाने स्पष्ट भूमिका घेतली आहे. सध्या बहुतांश कंपन्यांकडून पोलीस पडताळणीची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या काळात सर्व आस्थापनांना स्पष्ट निर्देश दिले जातील की, पोलीस पडताळणीशिवाय कोणत्याही कामगाराची नोंदणी करू नये.

## संपादकीय

# नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्याचे बहुआयामी परिणाम

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इस्रायल दौरा हा केवळ द्विपक्षीय भेट नव्हता; तो सध्याच्या गढूळ आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारताने घेतलेल्या संतुलित भूमिकेचा महत्त्वपूर्ण संकेत ठरला. एकीकडे गाझा पट्टीतील दीर्घकाळ लांबलेले युद्ध, तर दुसरीकडे अमेरिका–इराण यांच्यातील तणावाचे दाटलेले ढग—या पार्श्वभूमीवर हा दौरा पार पडला. त्यामुळे भारत नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे जगाचे लक्ष लागले होते.**

भारत-इस्रायल संबंध गेल्या तीन दशकांत लक्षणीयरीत्या दृढ झाले आहेत. संरक्षण, कृषी, पाणी व्यवस्थापन, सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांत दोन्ही देशांनी परस्पर सहकार्य वाढवले आहे. या भेटीत विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम फिजिक्स, दुर्मीळ खनिजे, वस्तू व सेवांची देवाणघेवाण, सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करणे आणि बौद्धिक स्वामित्वाचे नियम स्पष्ट करणे अशा अनेक मुद्द्यांवर सहमती झाली. भारत-इस्रायल मुक्त व्यापार कराराच्या सूतोवाचामुळे आर्थिक सहकार्याला नवे परिमाण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान सहकार्यवाढीसाठी मंत्रालय पातळीवर संयुक्त समिती स्थापन करण्याचा निर्णय, आर्थिक संवाद वाढवणे, कृषी संशोधनासाठी फेलोशिप योजना आणि शैक्षणिक देवाणघेवाणीचे व्यासपीठ उभारणे ही पावले महत्त्वाची मानली जात आहेत. येत्या काळात ५० हजार भारतीयांना इस्रायलमध्ये प्रवेशाची संधी उपलब्ध होणार असल्याचे संकेत देण्यात आले. तसेच संसदीय मैत्री गटाची स्थापना करून राजनैतिक संवादाला संस्थात्मक बळ देण्याचा प्रयत्न झाला आहे. संरक्षण क्षेत्रात इस्रायली तंत्रज्ञानाचा भारताला वेळोवेळी लाभ झाला आहे. दहशतवादविरोधी कारवायांमध्ये माहिती-विनिमय आणि तांत्रिक सहकार्यामुळे भारताची क्षमता वाढली आहे. त्यामुळे या दौऱ्यात संरक्षण सहकार्यावर सविस्तर चर्चा होणे अपेक्षितच होते. त्याचबरोबर भारतीय ‘युनिफाइड पेमेंट इंटरफेस’ (UPI) प्रणालीचा इस्रायलमध्ये वापराचा मार्ग खुला होणे, हे डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. मात्र या दौऱ्याचा राजकीय आणि नैतिक पैलू अधिक चर्चेत राहिला. बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील इस्रायल सरकारवर गाझामधील कारवायांबाबत मानवाधिकार उल्लंघनाचे आरोप होत आहेत. हजारो पॅलेस्टिनी नागरिकांच्या मृत्यूमुळे जागतिक स्तरावर टीका होत असताना भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशाची भूमिका काय असेल, याबाबत उत्सुकता होती. मोदी यांनी ‘हमास’च्या हल्ल्यातील बळींच्या कुटुंबीयांशी सहवेदना व्यक्त केली आणि शांततेच्या प्रयत्नांना पाठिंबा दर्शवला. परंतु गाझामधील मोठ्या प्रमाणावर झालेल्या नागरी जीवितहानीबाबत स्पष्ट शब्दांत उल्लेख न झाल्याने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. भारताची पारंपरिक भूमिका लक्षात घेतली तर स्वातंत्र्योत्तर काळात भारताने पॅलेस्टिनी हक्कांना पाठिंबा दिला होता. बदलत्या भूराजकीय वास्तवात, विशेषतः १९९० नंतर, भारताने इस्रायलशी राजनैतिक संबंध दृढ केले आणि संतुलित भूमिका स्वीकारली. आजही भारताने पॅलेस्टाइनमध्ये २१ कोटी डॉलरचे विकास प्रकल्प हाती घेतले आहेत, हे या संतुलनाचे द्योतक आहे. त्यामुळे इस्रायलशी सहकार्य वाढवताना पॅलेस्टिनी जनतेच्या मानवाधिकारांबाबतची बांधिलकी कायम ठेवणे, हा भारतासमोरील कळीचा प्रश्न आहे.या संदर्भात आखाती देशांशी असलेले भारताचे संबंधही महत्त्वाचे ठरतात. सौदी अरेबिया आणि कतार यांसारखे देश भारताचे विश्वासू भागीदार आहेत. लाखो भारतीय नागरिक या देशांत रोजगारासाठी वास्तव्यास असून, भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही हे संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत. या देशांनी भारताच्या भूमिकेबाबत सार्वजनिक आक्षेप नोंदवलेला नाही, हे भारतासाठी सकारात्मक संकेत आहेत. त्याचबरोबर इराणमधील चाबहार बंदर प्रकल्प भारताच्या प्रादेशिक धोरणाचा केंद्रबिंदू आहे. इराण-अमेरिका तणाव आणि त्यातील इस्रायलची भूमिका लक्षात घेतल्यास भारताने अत्यंत सावध आणि दूरदृष्टीपूर्ण पावले उचलणे आवश्यक आहे. एका बाजूला दहशतवादविरोधी सहकारी इस्रायल, तर दुसऱ्या बाजूला आखाती देशांशी असलेले आर्थिक आणि सामाजिक हितसंबंध—या दोन्हींचा समतोल राखणे हीच भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी कसोटी आहे. या दौऱ्याला देशांतर्गत राजकारणाचा रंग देण्याचाही प्रयत्न झाला. काही विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करत, ‘मानवाधिकारांच्या प्रश्नावर भारताने अधिक ठाम भूमिका घ्यावी’ अशी मागणी केली. तर दुसरीकडे समर्थकांनी या भेटीकडे भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे प्रतीक म्हणून पाहिले. परंतु या चर्चेतून एक गोष्ट स्पष्ट होते—भारताला आता केवळ प्रादेशिक नव्हे, तर जागतिक जबाबदारी स्वीकारावी लागत आहे. जगातील अनेक संघर्षांमध्ये भारताने ‘शांततेचा पक्ष’ निवडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे इस्रायल दौरा हा केवळ द्विपक्षीय संबंधांचा विस्तार नसून, भारताने आखाती प्रदेशात संतुलन राखण्याच्या धोरणाचा भाग म्हणून पाहिला पाहिजे. दहशतवादाला ठाम विरोध, मानवाधिकारांचे संरक्षण, आर्थिक-सामरिक हितसंबंधांची जोपासना आणि सर्व पक्षांशी संवाद—या चौकटीत भारताची भूमिका आकार घेताना दिसते.शेवटी, या संपूर्ण प्रश्नाकडे केवळ ‘हिंदू-मुस्लिम’ किंवा देशांतर्गत राजकारणाच्या चष्म्यातून पाहणे उथळ ठरेल. भारताची परराष्ट्र नीती ही दीर्घकालीन राष्ट्रीय हितसंबंध, प्रादेशिक स्थैर्य आणि जागतिक शांतता यांचा विचार करून आखली जाते. मोदींचा इस्रायल दौरा हा त्या व्यापक समीकरणातील एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल—ज्यात संतुलन, व्यावहारिकता आणि जागतिक जबाबदारी यांची कसोटी लागणार आहे.

# निर्णायक विजयाशिवाय पाचवे वर्ष: रशिया–युक्रेन युद्धाचा लेखाजोखा

उलट त्याने रशियाला कठोर प्रत्युत्तर दिले आहे. मात्र अमेरिकेतील सत्तांतरानंतर अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे युक्रेनवर अवमानकारक अटींसह शांतता करार स्वीकारण्याचा दबाव वाढल्याचे चित्र आहे. परिणामी, या युद्धात कोणालाही निर्णायक विजय मिळालेला नाही, हेच वास्तव ठरते.

या संघर्षाची मानवी किंमत प्रचंड आहे. लाखो नागरिक विस्थापित झाले; सुमारे साठ लाख युक्रेनियन निर्वासित म्हणून युरोपातील विविध देशांत आश्रयाला गेले. हजारो सैनिक आणि नागरिकांचा बळी गेला. दोन्ही देशांचा संरक्षणावरील खर्च प्रचंड वाढला—चार वर्षांत तो दुपटीहून अधिक झाला—आणि त्याचा अर्थव्यवस्थांवर गंभीर परिणाम झाला. युक्रेनला युरोपीय देश आणि अमेरिका यांनी अब्जावधी डॉलरची आर्थिक व लष्करी मदत पुरवली; त्या पाठबळावरच युक्रेन रशियाशी दोन हात करू शकला. मात्र ट्रम्प प्रशासनाने मदतीला खीळ घातल्याने कीवसमोर अडचणी वाढल्या आहेत. दुसरीकडे रशियावर घातलेल्या निर्बंधांमुळे आणि युरोपातील मालमत्ता गोठवल्यामुळे मॉस्कोलाही आर्थिक फटका बसला आहे. चार वर्षांचा हा लेखाजोखा युद्धाच्या परिणामशून्यतेकडे निर्देश करतो.

युद्धाच्या मुळाशी पुतिन यांची स्पष्ट उद्दिष्टे होती. पहिले, युक्रेनला NATOचे सदस्यत्व मिळण्यापासून रोखणे. पुतिन यांच्या मते, युक्रेन नाटोमध्ये गेल्यास अमेरिकेचा प्रभाव थेट रशियाच्या सीमेवर येईल. दुसरे उद्दिष्ट म्हणजे युक्रेनमधील रशियन भाषिक प्रदेशांचे संरक्षण; आणि तिसरे म्हणजे कीवमध्ये रशियाला अनुकूल सरकार स्थापणे. नाटो सदस्यत्वाबाबत तत्त्वतः समर्थन असले तरी प्रत्यक्ष सदस्यत्व अद्याप मिळालेले नाही; आणि सध्याच्या राजकीय वातावरणात ते तातडीने मिळण्याची शक्यता कमी दिसते. जिनिव्हामधील चर्चांमध्ये हा मुद्दा युक्रेनकडून मागे घ्यावा, असा दबाव असल्याची चर्चा आहे.

**» चार वर्षांपूर्वी “काही दिवसांत युक्रेनला नमवू” अशा आविर्भावात रशियाने सुरू केलेले युद्ध आता पाचव्या वर्षात प्रवेशले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर इतक्या प्रदीर्घ कालावधीचे युद्ध रशियाने लढलेले नाही. अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी ज्या उद्दिष्टांसाठी हे युद्ध छेडले, त्यांची अंशतः पूर्तता होताना दिसत असली तरी युक्रेन पूर्णतः पराभूत झालेला नाही.**



भौगोलिक आघाडीवर पाहता, युक्रेनच्या पूर्वेकडील रशियालगतच्या भागावर मॉस्कोने वर्चस्व मिळवले आहे. सुमारे वीस टक्के भूभाग रशियाच्या ताब्यात असल्याचे मानले जाते. हा प्रदेश परत मिळवणे युक्रेनसाठी कठीण ठरत आहे. या वास्तवाला मान्यता देण्याबाबत पाश्चिमात्य देशांत मतभेद आहेत. पुतिन यांच्यासाठी हे युद्ध “राष्ट्रीय सुरक्षेचे” आणि “ऐतिहासिक हक्कांचे” रक्षण म्हणून सादर केले गेले. देशांतर्गत पातळीवर त्यांनी रशियाला समर्थ राष्ट्र म्हणून उभे केल्याचा संदेश दिला; तरी आर्थिक अडचणी आणि निर्बंधांमुळे सामान्य नागरिकांमध्ये समाधानाचा सूर सर्वत्र नाही, असे विविध आकलन सूचित करतात.

युद्ध सुरू झाल्यानंतर युरोपीय देश युक्रेनच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी केवळ शस्त्रास्त्रांची मदत केली नाही, तर निर्वासितांसाठी सीमाद्वारेही उघडल्या. रशियाच्या आक्रमणाचा जागतिक स्तरावर निषेध झाला; पण युरोप व अमेरिका वगळता बहुतेक देशांनी कोणत्याही एका बाजूची स्पष्ट साथ दिली नाही. “ही युरोपची समस्या” अशीही भूमिका काहींनी घेतली. नव्या भू-राजकारणात प्रत्येक देश आपापल्या हितसंबंधांच्या चष्म्यातून या युद्धाकडे पाहताना दिसला. भारतासारख्या देशानेही संतुलित भूमिका घेतली. युद्ध तातडीने थांबावे, असा आग्रह मॉस्कोसमोर ठेवत असतानाच, रशियाशी ऐतिहासिक संबंध पूर्णपणे तोडले नाहीत. ऊर्जा, संरक्षण आणि बहुपक्षीय मंचांवरील सहकार्य लक्षात घेता, भारताने संवादाचे दरवाजे उघडे ठेवले. ही भूमिका ‘धोरणात्मक स्वायत्तते’चे उदाहरण म्हणून पाहिली जाते.

आजच्या टप्प्यावर प्रश्न असा उरतो की, या युद्धाने नेमके काय साधले? युक्रेन पूर्णतः पराभूत झाला नाही; रशियालाही अपेक्षित वेगवान विजय मिळाला नाही. नाटो सदस्यत्वाचा प्रश्न अनिश्चितच आहे. सीमारेषा बदलल्या असल्या, तरी स्थैर्य दूर आहे. आर्थिक व मानवी हानी मात्र निर्विवाद आहे. युद्ध जितके लांबते, तितकी तडजोड अधिक कठीण होते—आणि समाजातील जखमा खोल जातात.

या संघर्षाने आणखी एक कटू सत्य अधोरेखित केले आहे: महत्त्वाकांक्षी किंवा आक्रमक राजकीय निर्णयांचा भार सामान्य नागरिकांनाच सर्वाधिक सहन करावा लागतो.

युद्धखोर नेतृत्व आपले ध्येय साध्य करण्यासाठी देशाला आणि जगाला वेठीस धरू शकते; पण त्याची किंमत पिढ्यान्पिढ्या मोजावी लागते. रशिया–युक्रेन युद्धाचे पाचवे वर्ष सुरू होत असताना, निर्णायक विजयाऐवजी संवाद आणि तडजोडीचीच गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. शस्त्रांनी आखलेल्या सीमांपेक्षा टिकाऊ शांतता अधिक सामर्थ्यवान असते—ही जाणीव सर्व संबंधितांनी मान्य केल्याशिवाय या संघर्षाला खरा शेवट लाभणार नाही.

# स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्जास मुदतवाढ देण्याची मागणी

## सुट्ट्यांमुळे कागदपत्रांसाठी कमी वेळ; प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** महानगर पालिकातील स्वीकृत नगरसेवक पदांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत २ मार्च २०२६ जाहीर करण्यात आली असली, तरी सलग सुट्ट्यांमुळे इच्छुक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अत्यल्प वेळ मिळत असल्याची तक्रार पुढे आली आहे. २८ फेब्रुवारीला शनिवार आणि त्यानंतर रविवारची शासकीय सुट्टी येत असल्याने अर्ज प्रक्रियेस मुदतवाढ देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



स्वीकृत नगरसेवक पदासाठी सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, वकील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अर्ज दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र आवश्यक दाखले, शिफारसपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व इतर पूरक कागदपत्रे गोळा करण्यासाठी पुरेसा अवधी मिळत नसल्याने अनेक इच्छुक उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने काही दिवसांची मुदतवाढ दिल्यास अधिक पात्र आणि सक्षम उमेदवारांना संधी मिळेल, असा सूर उमेदवारांकडून व्यक्त होत आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदन देऊन मुदतवाढ देण्याची औपचारिक मागणी केली आहे. समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळावी, तसेच प्रक्रियेतील पारदर्शकता अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, या मागणीवर प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागले असून, लवकरच याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये ३ ते ५ मार्चदरम्यान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी आणि गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते ५ मार्चदरम्यान आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे ‘पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६’ आयोजित करण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ तसेच भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्था यांच्या सहकार्याने हा महोत्सव रंगणार आहे.

**+ ४३ देशांतील ११६ चित्रपटांचा जल्लोष**

यंदा तब्बल ४३ देशांतील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली असून लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन आणि दीर्घपट अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. विज्ञान, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, सामाजिक समता, मानवाधिकार, तंत्रज्ञान, युवा नेतृत्व, हवामान बदल यांसारख्या विषयांवर आधारित चित्रपट प्रेक्षकांना पाहता येणार आहेत. सर्व चित्रपट प्रेक्षकांसाठी पूर्णपणे विनामूल्य खुले असतील.

महोत्सवात ‘सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक’ हा विशेष पुरस्कार देण्यात येणार असून ५ मार्च रोजी पारितोषिक वितरण सोहळा होणार आहे.

# थकबाकीदारांसाठी मोठा दिलासा; १ मार्चपासून ‘अभय योजना’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकातर्फे थकबाकीदार मालमत्ताधारकांसाठी मोठा दिलासा देणारी ‘अभय योजना’ १ मार्चपासून सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ताकराची संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास मनपा करावरील विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी लागू राहणार आहे.

शहरातील सुमारे ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी आतापर्यंत ७४७ कोटी रुपयांचा कर भरून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मात्र, सुमारे २ लाख १२ हजार ४४० मालमत्तांवर अद्याप कर थकबाकी आहे. वसुली मोहिमेला गती देण्यासाठी १८ विभागीय कार्यालयांमार्फत विशेष पथके कार्यरत असून थकबाकीदारांशी थेट संपर्क साधला जात आहे.

‘अभय योजना’ निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांसाठी लागू असून आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील थकबाकीसह संपूर्ण रक्कम १ ते ३१ मार्चदरम्यान भरल्यासच सवलतीचा लाभ मिळणार आहे. महापौर रवि लांडगे यांनी ही मर्यादित कालावधीची संधी साधून नागरिकांनी थकीत कर भरावा, असे आवाहन केले आहे. आयुक्त श्रावण हर्डीकर यांनीही मुदत संपल्यानंतर नियमित वसुली प्रक्रिया सुरू राहील, असा इशारा देत त्वरित भरणा करण्याचे आवाहन केले आहे.

# अवैध गुटखा विक्रीवर विधानसभेत ‘पोलखोल’; आमदार शंकर जगतापांचा घणाघात

## तारांकित प्रश्नानंतर उघड झाली धक्कादायक आकडेवारी; २०२५ मध्ये २३९ कोटींचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूवर कडक बंदी असतानाही अवैध विक्री आणि उत्पादन सुरू असल्याचे वास्तव विधानसभेत समोर आले. पिंपरी-चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नामुळे गुटखाबंदीच्या अंमलबजावणीतील त्रुटी उघड झाल्या. गेल्या पाच वर्षांत राज्यभरात १३ हजार ७८० गुन्हे दाखल झाले असून १८ हजार ५०१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एकट्या २०२५ मध्ये तब्बल २३९ कोटी १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात



आल्याची माहिती सरकारने दिली.

राज्यात २० जुलै २०१२ पासून दरवर्षी गुटखाबंदीचे आदेश नूतनीकरण केले जातात. सध्याच्या अधिसूचनेनुसार उत्पादन, साठा, वितरण आणि वाहतुकीवर पूर्ण बंदी आहे. तरीही मुंबई, ठाणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांत अवैध व्यवहार सुरू असल्याचे आमदार जगताप यांनी निदर्शनास आणले. तारांकित प्रश्न क्रमांक २३१२७ द्वारे त्यांनी गुटखाबंदीची प्रभावी अंमलबजावणी का होत नाही, याबाबत सरकारला जाब विचारला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देताना पोलीस कारवाईची सविस्तर आकडेवारी सादर केली. २०२१ ते २०२५ या कालावधीत हजारो गुन्ह्यांची नोंद झाली असून हजारो आरोपींना गजाआड करण्यात आले आहे. ‘अन्न सुरक्षा व मानके कायदा’ अंतर्गत दोषींवर कारवाई सुरू असून ती अधिक कडक केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आमदार शंकर जगताप यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, “तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या गर्तेत जाऊ नये, यासाठी गुटखाबंदीची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. केवळ आकडेवारी मांडून चालणार नाही; प्रत्यक्षात अवैध विक्री पूर्णपणे बंद करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत.” गुटखाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला. या चर्चेमुळे राज्यातील गुटखाबंदीच्या अंमलबजावणीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, येत्या काळात प्रशासन किती प्रभावी कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त चिंचवड येथे भावपूर्ण सत्कार; “हा सन्मान सर्व लोककलावंतांचा” – खेडकर

# महानगरपालिकातर्फे पद्मश्री रघुवीर तुकाराम खेडकर यांचा नागरी सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** फेब्रुवारी २०२६: कष्टकऱ्यांची उद्योगनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ज्येष्ठ तमाशा कलावंत पद्मश्री रघुवीर तुकाराम खेडकर यांचा नागरी सन्मान करण्यात आला. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र, भक्ती-शक्ती समूह शिल्प प्रतिकृती व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



या प्रसंगी बोलताना खेडकर म्हणाले, “महापालिकेने केलेला हा सन्मान केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून तमाशा आणि लोककलेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक कलावंताचा गौरव आहे. या सन्मानामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून नव्या उर्जेने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.” आयुष्यभर ज्या कलेने ओळख दिली, त्या तमाशा कलेची सेवा अखेरपर्यंत करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खेडकर यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाची आठवण करून दिली. “घरची परिस्थिती कठीण असल्याने पाचवीतच शाळा सोडून आईसोबत तमाशात काम सुरू केले. अनेकदा विनामूल्य कार्यक्रम केले. कधी पाण्याचीही अपेक्षा ठेवली नाही,” असे ते म्हणाले. तमाशात वेगळेपणा आणण्यासाठी त्यांनी तीन वर्षे शास्त्रीय संगीताचे धडे घेतले आणि ते सादरीकरणात समाविष्ट केले. “मी जुन्या कलावंतांकडून शिकलेली परंपरा पुढे नेली. आज लोकांना ती नवीन वाटते, पण ती आपल्या संस्कृतीचीच आहे,” असे त्यांनी नमूद केले. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने त्यांनी ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांची आठवण काढत, “ते मला खडीसाखर देऊन ‘गोड राहा’ असे म्हणायचे,” अशी भावूक आठवण सांगितली. पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्यावर झालेला आनंद आणि अभिमानही त्यांनी व्यक्त केला.

महापौर रवि लांडगे म्हणाले, “मराठी भाषा ही संत परंपरेतून समृद्ध झालेली आहे. तमाशासारख्या लोककलेतून मराठी भाषा घराघरात पोहोचवण्याचे कार्य खेडकर यांनी केले आहे.” शासनाने पद्मश्री देऊन त्यांच्या योगदानाची योग्य दखल घेतल्याचे त्यांनी सांगितले.

विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी “रघुवीर खेडकर म्हणजे लोककलेची गंगोत्री” असे गौरवोद्गार काढले, तर उपमहापौर शर्मिला बाबर यांनी त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास विविध मान्यवर, महापालिका अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन किरण गायकवाड यांनी केले.

# वापरात नसलेल्या वस्तू आर.आर.आर. केंद्रात जमा करून पुनर्वापराला चालना द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाचे आवाहन**

**पुणे :** पिंपरी, २७ फेब्रुवारी २०२६ : घरातील साफसफाईदरम्यान जुनी खेळणी, कपडे, भांडी, फर्निचर किंवा इलेक्ट्रॉनिक वस्तू अनेकदा रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी टाकल्या जातात. त्यामुळे शहराचे सौंदर्य बाधित होते आणि कचऱ्याचे प्रमाण वाढते. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाने नागरिकांना घरातील वापरात नसलेल्या पण सुस्थितीत असलेल्या वस्तू जवळच्या आर.आर.आर. (रिड्यूस, रियुज, रिसायकल) केंद्रात जमा करण्याचे आवाहन केले आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी ही केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. जमा झालेल्या वस्तू गरजूंपर्यंत पोहोचवून त्यांचा पुनर्वापर केला जातो. त्यामुळे कचरा कमी होऊन शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक राहण्यास मदत होते. नागरिकांनी पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, चांगल्या स्थितीतील कपडे, चादरी, पडदे, खेळणी, भांडी, फर्निचर, छोटे-मोठे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, चपला तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या इतर वस्तू आर.आर.आर. केंद्रात जमा कराव्यात. या उपक्रमातून स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधला जात असून नागरिकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### निरगुडसर येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**लोणी-धामणी :** पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, निरगुडसर (ता. आंबेगाव) येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. C. V. Raman यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

विज्ञान शिक्षक बाळासाहेब येवले यांनी रमण यांच्या कार्याची माहिती दिली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी आनंद मेळावा, आठवडे बाजार व खाऊगल्लीचे स्टॉल लावून व्यवहारज्ञान, नेतृत्व व आत्मविश्वास वाढविण्याचा उपक्रम राबविला. पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपक्रमाचे कौतुक केले.

### भोरवाडीत मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**अवसरी खुर्द :** भोरवाडी (ता. आंबेगाव) येथे शिव सम्राट युवा प्रतिष्ठानच्या वतीने रविवार, १० मे २०२६ रोजी मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सहकार महर्षी माजी आमदार दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गेली १६ वर्षे हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. यावर्षी विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नववधूस २५ हजार रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. अधिकाधिक वधू-वरांनी या सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव विकास भोर यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी अध्यक्ष किरण भोर व प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले आहे.

---

**सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी महावितरण कार्यालयात निर्णायक बैठक**

# खेड तालुक्यात रोहित्र चोऱ्यांचा सुळसुळाट; शेतकरी संतप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून रोहित्र (डीपी) चोऱ्यांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले असून रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकरी हैराण झाले आहेत. सततच्या चोरीमुळे वीज पुरवठा खंडित होत असून, तो पूर्ववत करण्यात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) विलंब करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

खेड बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील यांनी शुक्रवारी (दि. २७) राजगुरुनगर येथील महावितरण कार्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना जाब विचारला. "वर्षभरात जवळपास ५०० रोहित्र फोडून त्यातील तांब्याच्या तारा चोरी झाल्या, मात्र एकाही प्रकरणात ठोस तपास किंवा चोरांचा शोध लागलेला नाही," असा आरोप त्यांनी केला.

रब्बी हंगामात गहू, हरभरा आदी पिके बहरात असताना अचानक वीज खंडित होत असल्याने सिंचन व्यवस्था ठप्प होत आहे. मुबलक पाणी उपलब्ध असूनही वीज नसल्याने पिके जळून जात असल्याची व्यथा शेतकरी व्यक्त करीत आहेत. भांडवली खर्च करून उभे केलेले पीक हातातोंडाशी आले असताना वीजेअभावी वाया जात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजनांच्या डीपीचीही वारंवार चोरी होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनावरही निष्क्रियतेचा आरोप होत आहे. "महावितरण बेदखल आणि पोलिस प्रशासन आडमुठी भूमिका घेत आहे," अशी टीका शेतकऱ्यांनी केली.

मरकळ येथील युवा शेतकऱ्यांनी विजयसिंह शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. मात्र समाधानकारक उत्तर किंवा तातडीची कारवाई होण्याची चिन्हे दिसली नसल्याने सोमवारी (दि. २) तालुक्यातील सर्व तक्रारदार शेतकऱ्यांनी एकत्र येऊन पुन्हा कार्यालयात बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीत रोहित्र चोरी रोखण्यासाठी कडक उपाययोजना, जलद वीजपुरवठा पुनर्संचयित करण्याची प्रक्रिया आणि पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्याची मागणी केली जाणार आहे. दरम्यान, तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, प्रश्न तातडीने न सुटल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

---

# खेडमध्ये जुगार अड्ड्यावर छापा; २८ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाकूर पिंपरी (शिवलेवस्ती) येथे पोलिसांचा छापा; १० मुख्य आरोपींसह ४२ पेक्षा अधिक वाहने ताब्यात**

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील ठाकूर पिंपरी (शिवलेवस्ती), ता. खेड येथे सुरू असलेल्या तीन पत्ती जुगार अड्ड्यावर खेड पोलिसांनी शुक्रवारी (दि. २७) दुपारी धडक कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला. खेडचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास छापा टाकत हा अड्डा उद्ध्वस्त केला.

बाळू विष्णू शिवले यांच्या पत्राशेडमध्ये बेकायदा जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नियोजनबद्ध कारवाई करत पोलिसांनी १० मुख्य आरोपींसह १५ ते २० जणांना जुगार खेळताना रंगेहात पकडले. पोलिस हवालदार सुनील ज्ञानेश्वर बांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत रोख रक्कम, जुगार साहित्य आणि वाहनांसह एकूण २८ लाख १८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींच्या अंगझडतीतून प्रत्येकी ५०० ते १,००० रुपयांपर्यंत रोख रक्कम आणि तीन पत्तीचे पत्ते जप्त करण्यात आले. घटनास्थळावरून १० पत्त्यांचे कॅट, ३३ पत्त्यांची पाने, ५ गोलाकार प्लायवूड टेबल आणि ४० प्लास्टिक खुर्च्या ताब्यात घेण्यात आल्या.

याशिवाय ४२ पेक्षा अधिक वाहने जप्त करण्यात आली असून त्यामध्ये दोन टोयोटा फॉरच्युनर, एक टोयोटा इनोव्हा, एक मारुती सुझुकी स्विफ्ट, एक ह्युंदाई आय-20, एक मारुती सुझुकी, बलेनो, एक ह्युंदाई सॅन्ट्रो तसेच अनेक दुचाकी व दोन रिक्षांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार या जुगार अड्ड्याचे मुख्य आयोजक म्हणून बाळू शिवले, बाबू ढमाले आणि नवनाथ धोत्रे यांची नावे समोर आली आहेत.

---

# घोड शाखेला पाणी सोडल्याने रब्बी पिकांना जीवदान

**डिंभे धरणाच्या डाव्या कालव्याच्या आवर्तनामुळे आंबेगाव पूर्व भागातील शेतकऱ्यांना दिलासा**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** डिंभे धरण येथील डाव्या कालव्याच्या घोड शाखेला जलसंपदा विभागाने अलीकडेच पाण्याचे आवर्तन सोडल्याने आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये मोठा दिलासा मिळाला आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच पाण्याची टंचाई जाणवू लागलेल्या या भागातील शेतकऱ्यांना या निर्णयामुळे रब्बी हंगामातील पिके वाचवण्याची संधी मिळाली आहे.

तालुक्यातील लौकी, जाधववाडी, थोरांदळे, खडकी, भराडी आणि जवळे या गावांमध्ये विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी लक्षणीयरीत्या घटली होती. परिणामी गहू, हरभरा आणि कांदा यांसारखी रब्बी पिके करपण्याच्या मार्गावर होती. विशेषतः गव्हाचे पीक अंतिम टप्प्यात असताना आणि हरभऱ्याला शेंगा लागण्याच्या अवस्थेत पाण्याअभावी उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात होती.

मात्र, जलसंपदा विभागाने योग्य वेळी पाण्याचे आवर्तन सोडल्याने कालव्यालगतच्या शेतकऱ्यांनी तातडीने आपल्या शेतात पाणी वळवून पिकांना दिलासा दिला. या टप्प्यावर मिळालेले पाणी उत्पादनवाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. "अंतिम वाढीच्या अवस्थेत पाणी मिळाल्याने दाणे भरण्यास मदत होईल आणि उत्पादनात चांगली वाढ अपेक्षित आहे," अशी प्रतिक्रिया काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाण्याची कमतरता भासू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. मात्र, या आवर्तनामुळे परिस्थिती काहीशी सुसह्य झाली आहे. पुढील कालावधीतही वेळेवर पाणी मिळाल्यास रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान टळून उत्पादनात वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने योग्य नियोजन आणि वेळेवर निर्णय घेतल्यास शेतीक्षेत्राला मोठा आधार मिळू शकतो, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

---

# आळंदीत आमलकी एकादशी निमित्त भाविकांची उसळलेली गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**माऊली मंदिरात आकर्षक पुष्पसजावट; इंद्रायणी घाटावर हरिनाम गजरात आरती**

**आळंदी :** आमलकी एकादशीच्या पावन दिनी श्री ज्ञानेश्वर माऊली मंदिर, आळंदी येथे सुमारे पन्नास हजारांहून अधिक भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. पहाटेपासूनच हरिनामाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. परंपरेनुसार विविध धार्मिक कार्यक्रमांतून एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली.

एकादशी निमित्त पहाटे वेदमंत्रांच्या जयघोषात पवमान अभिषेक पार पडला. मंदिरातील गाभाऱ्यात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी फुलांनी सजलेले श्रींचे रूप भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. दिवसभर भाविकांनी मंदिर दर्शन, नगरप्रदक्षिणा व हरिनाम गजरात सहभाग नोंदवला. दुपारी फराळाचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला, तर वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने प्रवचनाचा कार्यक्रम झाला. रात्री धुपारतीने धार्मिक सोहळ्याची सांगता झाली. दर्शनासाठी आलेल्या भाविकांची सोय व्हावी यासाठी मंदिर प्रशासनाने विशेष व्यवस्था केली होती. व्यवस्थापक माउली वीर व उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक, सुरक्षा रक्षक व पोलिसांच्या सहकार्याने सुरळीत नियोजन केले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आळंदी पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेने प्रभावी बंदोबस्त ठेवला.

दरम्यान, इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समितीच्या वतीने हरिनाम गजरात आरती उत्साहात पार पडली. इंद्रायणी आरती ग्रुप, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान व विविध महिला मंडळांच्या सहभागाने घाट परिसर भक्तिमय झाला. आरतीनंतर पसायदान व प्रसाद वितरण करण्यात आले. इंद्रायणी नदीचे पावित्र्य जपण्यासाठी आणि प्रदूषणमुक्तीसाठी सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले. घाटावर स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. एकादशी निमित्त आळंदीतील धार्मिक वातावरण, सुरळीत वाहतूक नियोजन आणि शिस्तबद्ध दर्शन व्यवस्थेमुळे भाविकांनी समाधान व्यक्त करत पोलीस व मंदिर प्रशासनाचे कौतुक केले.

---

# 'राष्ट्रीय पाली गौरव २०२६'साठी नामांकनाचे आवाहन

**अभिजात दर्जानंतर पाली भाषेच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम; १५ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पाली भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर तिच्या संवर्धन व प्रसारासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पद्मपाणी फाउंडेशन प्रणित अभिजात पाली भाषा संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने "राष्ट्रीय पाली गौरव पुरस्कार २०२६" जाहीर करण्यात आला असून देशभरातून नामांकन मागविण्यात येत आहे.

पाली भाषा, बौद्ध अध्ययन आणि संबंधित संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राध्यापक, संशोधक, साहित्यिक व कार्यकर्त्यांचा या पुरस्काराद्वारे सन्मान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार रविवार, २२ मार्च २०२६ रोजी पुणे येथे आयोजित अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. संमेलनास देशभरातील पाली व बौद्ध अध्ययन क्षेत्रातील विद्वान, तज्ज्ञ व अभ्यासक उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. पात्रतेच्या निकषांनुसार देशातील महाविद्यालये व विद्यापीठांमधील पाली भाषा किंवा बौद्ध अध्ययन विभागातील प्राध्यापक, विभागप्रमुख, संशोधक तसेच पाली साहित्य निर्मिती, ग्रंथ संपादन, अनुवाद, अभ्यासक्रम विकास किंवा पाली भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती अर्ज करू शकतात. या पुरस्कारासाठी स्वयं-नामांकन तसेच विभागप्रमुख किंवा सहकाऱ्यांकडून नामांकन सादर करता येणार आहे. अर्जासोबत सविस्तर परिचयपत्र (CV), प्रकाशित पुस्तके/संशोधन निबंध व कार्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. नामांकन सादर करण्याची अंतिम तारीख १५ मार्च २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

---

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काव्यसंमेलन रंगले

**पिंपळवंडी :** जुन्नर तालुक्यातील चाळकवाडी येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित शिवांजली साहित्य महोत्सवात काव्यसंमेलन उत्साहात पार पडले. महाराष्ट्र साहित्य परिषद, शिवांजली साहित्यापीठ व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

मराठी भाषा दिंडी काढल्यानंतर 'आठवणीतल्या कविता' सादर करण्यात आल्या. प्रा. द. स. काकडे, शरद लेंडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत भाऊ वाळुंज, डॉ. जयसिंग गाडेकर, डॉ. केशव बोरकर, अदिती चाळक यांसह अनेक कवींनी विविध विषयांवर कविता सादर केल्या. सूत्रसंचालन कवी संदीप वाघुले यांनी केले.

---

# डाळज नं. २ येथे भीषण तिहेरी अपघात; दोन वर्षांच्या चिमुकल्यासह तिघांचा मृत्यू

**वाढदिवसाच्या आनंदावर विरजण; सोलापूर-पुणे महामार्गावर शोककळा, तिघे जखमी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भिगवण :** डाळज नं. २ गावच्या हद्दीत सोलापूर-पुणे मार्गावर सोमवारी सायंकाळी झालेल्या भीषण तिहेरी अपघातात दोन वर्षांच्या चिमुकल्यासह तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघेजण जखमी झाले. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृतांमध्ये जय अमर हातेकर (वय २), आदिती अमर हातेकर (वय २५, रा. सांगोला, जि. सोलापूर) आणि सखुबाई ईश्वर गेजगे (वय अंदाजे ७०-७५, रा. पाटस, जि. पुणे) यांचा समावेश आहे. जखमी कबीरदास ईश्वर गेजगे, स्वाती कबीरदास गेजगे आणि त्यांची दहा महिन्यांची मुलगी यांच्यावर उपचार सुरू आहेत.

जयचा वाढदिवस कालच सांगोला येथे आनंदात साजरा झाला होता. आजी-आजोबा व पणजी वाढदिवसासाठी आले होते. परतीच्या प्रवासात त्यांच्या इको (MH १२ XE ८८१६) गाडीने रस्त्यात टायर पंक्चरमुळे उभ्या असलेल्या आयशर (MH १३ CU ५१६३) वाहनाला मागून धडक दिली. प्रत्यक्षदर्शींनी इकोला अज्ञात वाहनानेही धडक दिल्याची शक्यता व्यक्त केली आहे.

अपघात इतका भीषण होता की काही मृतदेह रस्त्यावर फेकले गेले; वाढदिवसाची खेळणी अपघातस्थळी विखुरलेली दिसत होती. दरम्यान, महामार्गावर थांबणाऱ्या वाहनांनी परावर्तक चिन्हे व इशारा दिवे लावणे सक्तीचे करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पुढील तपास भिगवण पोलीस करीत आहेत.

---

**'झिरो ट्रॅफिक वॉर्डन'च्या वर्तनावर प्रश्नचिन्ह; बॉडी कॅम, गणवेश आणि अधिकारांबाबत चौकशीची मागणी**

# नाशिक फाटा येथे ट्रॅफिक कारवाईवरून वाद; जेष्ठ सिख नागरिकाला धमकीचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी-चिंचवड :** नाशिक फाटा येथे सकाळी सुमारे १० वाजता वाहतूक कारवाईदरम्यान एका वरिष्ठ सिख नागरिकासोबत गैरवर्तन झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. संबंधित नागरिक हे सामाजिक कार्यकर्ता व आरटीआय कार्यकर्ता असल्याची माहिती असून, त्यांना अपमानास्पद भाषेत धमकावल्याचा दावा करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वाहन विमा पॉलिसी काढण्यासाठी नाशिक फाटा चौकापासून सुमारे २०० ते ३०० मीटर अंतरावरील विमा कार्यालय आणि वाहन गॅरेजकडे जात असताना पोलिसांनी थांबवले. यावेळी उपस्थित असलेल्या पोलिस हवालदाराने पूर्ण गणवेश परिधान केला नव्हता (टोपी नसल्याचा आरोप) तसेच बॉडी कॅमेरा नसल्याने कारवाईची नोंद उपलब्ध नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

घटनेदरम्यान स्वत:ची ओळख "झिरो ट्रॅफिक वॉर्डन" म्हणून देणाऱ्या सोहेल पठाण यांनी अरे-तुरे भाषेत बोलून "डबल दंड लावू" अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिस्थिती चिघळत असताना संबंधित हवालदाराने वॉर्डनला थांबवले, यावरून वॉर्डनचे वर्तन अनियंत्रित होते का, असा सवाल उपस्थित होत आहे.

दंड आकारणीच्या अधिकाराबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. कायद्यानुसार ई-चलान मशीन अधिकृत पोलिस अधिकारी—पीएसआय, एएसआय किंवा अधिकृत आदेश असलेला हवालदार—यांच्याकडे असते. ट्रॅफिक वॉर्डनला थेट दंड आकारणीचा अधिकार नसल्याचे तज्ज्ञ सांगतात. संबंधित वॉर्डनची नेमणूक महापालिकेमार्फत झाल्याची चर्चा असून, तसे असल्यास वाहतूक दंड प्रक्रियेत त्यांचा सहभाग कशा अधिकारात होता, याबाबत स्पष्टीकरण मागितले जात आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून काही थेट प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत—बॉडी कॅमेरा का नव्हता? पूर्ण गणवेशाशिवाय ड्युटी कशी? "झिरो ट्रॅफिक वॉर्डन" म्हणून नेमणूक कोणत्या आदेशाने झाली? दंड आकारणी मशीन अधिकृतरित्या कोणाच्या नावावर आहे?

दरम्यान, या प्रकरणी संबंधित हवालदार व सोहेल पठाण यांना तात्काळ निलंबित करण्याची, स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नाशिक फाटा परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जतन करावे, वाहतूक अंमलबजावणीदरम्यान सर्व पोलिसांना बॉडी कॅमेरा सक्तीचा करावा आणि वॉर्डन नियुक्ती प्रक्रिया व अधिकार सार्वजनिक करावेत, अशीही मागणी पुढे आली आहे.

प्रकरणाची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नसून, पुढील चौकशीनंतर वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# वढू खुर्द येथे विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबिराची उत्साहात सांगता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सामाजिक बांधिलकी जपत युवकांनी राबवले विविध जनजागृती व स्वच्छता उपक्रम**

**आळंदी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंग, लोहगाव यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वढू खुर्द येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबिर २०२५-२६ ची उत्साहात सांगता झाली. शिबिराचे उद्घाटन सरपंच महेंद्र खांदवे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

सात दिवसीय शिबिरात 'शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व पडीक क्षेत्र व्यवस्थापन' या संकल्पनेअंतर्गत सलग समपातळी चर, वनराई बंधारे, वृक्षारोपण व संवर्धन आदी उपक्रम राबविण्यात आले. ग्रामपंचायत परिसर, स्मशानभूमी, जिल्हा परिषद शाळा व नदी स्वच्छता अभियानासह रस्त्यालगत वृक्षारोपण करण्यात आले.

याशिवाय व्यसनमुक्ती, लोकसंख्या नियंत्रण, हुंडाबंदी, निसर्ग संवर्धन यांसारख्या विषयांवर प्रभात फेरी, भित्तीचित्रण व सांस्कृतिक कार्यक्रमांतून जनजागृती करण्यात आली. सार्वजनिक व्यायामशाळा परिसर स्वच्छता आणि सर्व शिक्षा अभियानालाही स्वयंसेवकांनी हातभार लावला.

शिबिरादरम्यान व्यक्तिमत्व विकास, जलसंवर्धन व शाश्वत विकास विषयक तज्ज्ञांची प्रबोधनपर व्याख्याने झाली. प्राचार्य डॉ. फारुख सय्यद व कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. कमलजीत कौर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप घुले व शिक्षक प्रतिनिधींनी स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले. सामाजिक बांधिलकी जपत हे शिबिर आनंदी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले.

## सारांश वृत्त

### काही इस्लामिक देशांत होळीवर बंदी

**गुवाहाटी:** भारतामध्ये होळी, धुळवड आणि रंगपंचमी उत्साहात साजरी केली जाते; मात्र काही कट्टर इस्लामिक देशांत सार्वजनिकरीत्या रंग उधळण्यास कडक मनाई आहे. विशेषतः सौदी अरेबिया, इराण आणि अफगाणिस्तान यांसारख्या देशांत धार्मिक नियम कठोर असल्याने अशा उत्सवांना परवानगी नसते. नियम मोडल्यास दंड किंवा तुरुंगवासाची कारवाई होऊ शकते. त्यामुळे भारतीय सणांचा आनंद सर्वत्र समानपणे साजरा करता येत नाही, हे वास्तव आहे.

### पाकिस्तानी लढाऊ विमान पाडल्याचा दावा

**काबुल** : अफगाणिस्तानातील तालिबान अधिकाऱ्यांनी पूर्वेकडील जलालाबाद शहराजवळ पाकिस्तानचे लढाऊ विमान पाडल्याचा दावा केला आहे. AFP वृत्तसंस्थेनुसार, विमानाचा पायलट पॅराशूटच्या साहाय्याने खाली उतरला आणि त्याला जिवंत ताब्यात घेण्यात आले. स्थानिक रहिवाशांनीही स्फोटाचा आवाज ऐकल्याचे सांगितले. या घटनेमुळे अफगाणिस्तान–पाकिस्तान तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मध्यपूर्वेत भारतीय विद्यार्थी अडकल्याची भीती

**तेहरान** : मध्यपूर्वेत युद्धाचा भडका उडाला असून इस्रायल आणि अमेरिका यांच्या संयुक्त कारवाईनंतर इराणने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. शनिवारी इस्रायलने तेहरानमधील राष्ट्रपती भवन आणि गुप्तचर मुख्यालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले केल्याचा दावा आहे. त्यानंतर इराणने सौदी अरेबिया, जॉर्डन, कुवेत, यूएई, बहारीन आणि कतारमधील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य केल्याचे वृत्त आहे. या संघर्षामुळे संपूर्ण प्रदेशात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः इराकमध्ये नागरिक सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करत असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दरम्यान, इराणमधील काही शहरांमध्ये परिस्थिती गंभीर असून तेथे अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांनी भारत सरकारकडे मदतीची मागणी केली आहे.

## हल्ल्यात ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा इराणचा दावा

# अमेरिका-इस्रायलचा इराणवर भीषण हल्ला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्रायल यांनी शनिवारी (२८ फेब्रुवारी) संयुक्तरित्या इराणवर व्यापक लष्करी कारवाई केली, ज्यामुळे युद्धात तीव्रता वाढली आहे. या हल्ल्यांमध्ये दक्षिण इराणमधील मिनाब शहराजवळील एका मुलींनी भरलेल्या शाळेवर मिसाइल हल्ला झाल्याची माहिती मिळते; एका सरकारी वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार कमीतकमी ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाला आहे आणि ४५ हून अधिक जखमी झाले आहेत.

या हल्ल्यांचे कारण म्हणून संयुक्तपणे राबवलेल्या कारवायेत अमेरिकेचा ऐक्यबद्ध सहभाग असल्याचे सांगितले जात आहे. इस्रायल आणि अमेरिकेने इराणच्या विविध लष्करी ठिकाणांवर लक्ष्य साधल्याचे स्पष्ट झाले असून, त्यांनी आपले "सुरक्षा धोके" दूर करण्यासाठी हे पाऊल उठवले असल्याचे घोषित केले आहे.

इराणनं लगेच प्रत्युत्तर म्हणून मिसाइल हल्ले करून इस्रायल आणि काही अरब देशांमध्ये स्फोटांची नोंद झाली आहे. यामध्ये संयुक्त अरब अमिराती, कुवैत, बहरीन आणि कतारमध्येही गोळ्यांच्या आवाजाची नोंद झाली आहे.

इराण सरकारने देशभरात आणीबाणीची घोषणा केली असून नागरिकांना सुरक्षित भागात जाण्याचे निर्देश दिले आहेत. अनेक शहरांमध्ये निरनिराळ्या भागात स्फोट आणि धुर वाऱ्यांचा उदय झाल्याचे दृश्य नोंदवले गेले आहे.

या संघर्षाचे राजनैतिक आणि मानवी परिणाम गंभीर आहेत. शांततेच्या चर्चांमध्ये मध्यंतरी जेनेवा येथे काही प्रगतीच्या चर्चांनंतरही परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याचा मार्ग धरलेला दिसतो. अमेरिकेने या कारवाईला "गंभीर आणि विस्तृत" मोहिम म्हटले असून, ते इराणवर आणखी दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

या वाढत्या तणावामुळे मध्यपूर्वेतील नागरिकांची सुरक्षा, जागतिक तेल पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणे यांच्यावरही परिणाम होत आहेत. शांततेसाठी जगभरातील विविध देशांनी युद्धविराम आणि चर्चेचा आह्वान केला असून तरीही सध्याच्या परिस्थितीत युद्धविरामाचा मार्ग दृढ दिसत नाही. या हल्ल्यांमध्ये असंख्य सामान्य नागरिक प्रभावित झाले आहेत, आणि विशेषतः शाळेवर असलेला हल्ला मोठ्या प्रमाणावर मानवीय संकटाचे प्रतिबिंब आहे. या घटनेने जागतिक स्तरावर चिंता वाढवली असून संघर्षाचा भविष्यातील दिशाभानाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राहुल-वाद्रा जेलात गेले का?' – राष्ट्रीय राजकारणात नवा वाद

### केजरीवालांचा काँग्रेसवर घणाघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** दिल्लीच्या कथित आबकारी धोरण प्रकरणात विशेष राउज अव्हेन्यू न्यायालयाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि इतर आरोपींना पुराव्याअभावी डिस्चार्ज दिल्यानंतर राजधानीत राजकीय वातावरण तापले आहे. या निर्णयानंतर केजरीवाल यांनी थेट काँग्रेस नेतृत्वावर निशाणा साधत जोरदार टीका केली.

पत्रकार परिषदेत बोलताना केजरीवाल म्हणाले, "मी तुरुंगात गेलो; पण राहुल गांधी, रॉबर्ट वाड्रा किंवा सोनिया गांधी जेलात गेले का?" असा सवाल करत त्यांनी काँग्रेसवर 'द्वेषयुक्त राजकारण' आणि सत्तेसाठी दबाव तंत्र वापरल्याचा आरोप केला. काँग्रेसला "लाज वाटायला हवी" असेही ते म्हणाले. केजरीवाल यांनी पुढे आरोप केला की, भाजप आणि काँग्रेसमध्ये 'आडवा समझोता' असल्याचे संकेत दिसत आहेत. "दिल्लीतील जनतेला त्रास देणाऱ्या शक्तींविरुद्ध आम्ही लढत राहू," असे सांगत त्यांनी भाजपला खुले आव्हान दिले—"भाजपने दिल्लीत १० पेक्षा जास्त जागा जिंकल्या तर मी राजकारण सोडेन." दरम्यान, काँग्रेसनेही पलटवार करत न्यायालयीन निर्णयाच्या वेळेबाबत प्रश्न उपस्थित केले. काही काँग्रेस नेत्यांनी भाजप-आपमध्ये समझोता असल्याचा आरोप केला. पंजाब काँग्रेसच्या नेतृत्वाने याला राजकीय साजिश म्हटले असून न्यायप्रक्रियेचा वापर पक्षहितासाठी झाल्याचा दावा केला आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी केजरीवाल यांच्या डिस्चार्जला भाजपसाठी "नैतिक धक्का" असल्याचे म्हटले. दुसरीकडे, भाजपने हा निर्णय तांत्रिक बाबींवर आधारित असल्याचे सांगत काही पुराव्यांवर पुढील कायदेशीर पर्याय खुले असल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणाची चौकशी सीबीआय आणि ईडीकडून झाली होती.

## इराण–अमेरिका-इस्रायल संघर्षाचा भारतावर परिणाम?

### तेलदरवाढीपासून महागाईपर्यंत मोठा फटका संभव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील लष्करी संघर्ष तीव्र होत असून त्याचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्थेवर उमटू लागले आहेत. हवाई हल्ले आणि क्षेपणास्त्र कारवायांनंतर इराणकडून पलटवार करण्यात आला असून अमेरिकन लष्करी तळांबरोबरच इस्रायलमधील प्रमुख शहरांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर भारतालाही मोठी आर्थिक किंमत मोजावी लागू शकते.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या सुमारे ८५ टक्के गरजा आयातीद्वारे पूर्ण करतो. मध्यपूर्वेतील पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यास तेलाच्या किमती झपाट्याने वाढण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार कच्च्या तेलाच्या दरात प्रति बॅरल एका डॉलरची वाढ झाली तरी भारताचे वार्षिक आयात बिल सुमारे ९ हजार कोटी रुपयांनी वाढू शकते. यामुळे वित्तीय तूट वाढण्याबरोबरच रुपयावर दबाव येऊ शकतो. सध्या जागतिक बाजारात कच्च्या तेलाचा दर सुमारे ७१ डॉलर प्रति बॅरल आहे. मात्र संघर्ष दीर्घकाळ चालल्यास तो ९१ डॉलरपर्यंत जाऊ शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## तेहरानमध्ये भीषण स्फोट; अमेरिका–इस्रायलच्या कारवाईनंतर

# मध्यपूर्वेत तणाव शिगेला; इराणने हवाई क्षेत्र बंद केले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील तणावाला नवे वळण देत इस्रायलने इराणवर हवाई हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईनंतर इराणने तत्काळ आपले हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेतला असून राजधानी तेहरानमध्ये भीषण स्फोट झाल्याचे वृत्त आहे. या घडामोडींमुळे संपूर्ण प्रदेशातील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर "प्रतिबंधकात्मक क्षेपणास्त्र हल्ला" केल्याचे म्हटले आहे. इराणच्या लष्करी हालचाली आणि धोरणात्मक पावले लक्षात घेता ही कारवाई करण्यात आल्याचे दोन्ही देशांचे म्हणणे आहे. गेल्या काही आठवड्यांपासून वॉशिंग्टन आणि जेरूसलेमकडून इराणने आपले धोरण न बदलल्यास कारवाई अटळ असल्याचे संकेत दिले जात होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही यापूर्वी इराणला इशारा दिला होता. त्यांच्या सूचनेनंतरच ही लष्करी कारवाई झाल्याचे वृत्त आहे. इस्रायलच्या सुरक्षा यंत्रणांनी इराणकडून संभाव्य धोका असल्याचा दावा करत हा हल्ला केल्याचे सांगितले जात आहे.

हल्ल्यानंतर इराणने तातडीने आपले हवाई क्षेत्र बंद केले असून सर्व नागरी उड्डाणे थांबवण्यात आली आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय विमानवाहतुकीवरही परिणाम झाला आहे. तेहरानसह काही महत्त्वाच्या शहरांमध्ये सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत. या घडामोडींमुळे मध्यपूर्वेतील राजकीय आणि लष्करी समीकरणे अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. आधीच तणावपूर्ण असलेल्या परिस्थितीत या हल्ल्यामुळे व्यापक संघर्षाची शक्यता वर्तवली जात आहे.

## ऑनलाइन तिकीट, यूपीआय, सिम बाइंडिंग ते एलपीजी दरांपर्यंत मोठे बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** १ मार्चपासून देशभरात अनेक महत्त्वाचे नियम लागू होणार असून त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारांवर होणार आहे. ऑनलाइन रेल्वे तिकीट बुकिंग, UPI व्यवहार, सिम बाइंडिंग, तसेच LPG, CNG, PNG आणि एटीएफच्या दरांमध्ये बदल अपेक्षित आहेत.

आतापासून जनरल क्लास आणि प्लॅटफॉर्म तिकिटे Indian Railways च्या UTS on Mobile ॲपवरून बुक करता येणार नाहीत. ही तिकिटे आता केवळ RailOne या नव्या अधिकृत ॲपद्वारेच ऑनलाइन उपलब्ध असतील. त्यामुळे प्रवाशांनी नवीन ॲप डाउनलोड करून नोंदणी करणे आवश्यक ठरणार आहे.

डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठी सरकारने UPI संदर्भात नवा नियम लागू केला आहे. मोठ्या रकमेच्या व्यवहारांसाठी आता केवळ UPI पिन पुरेसा राहणार नाही. पिनसोबत बायोमेट्रिक किंवा मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन अनिवार्य असेल. त्यामुळे फसवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सायबर गुन्हे रोखण्यासाठी मेसेजिंग ॲप्स आता थेट सिम कार्डशी जोडले जाणार आहेत. व्हॉट्सॲप, टेलिग्राम किंवा सिग्नल वापरताना जर मोबाईलमधून सिम काढले, तर संबंधित ॲप्स तत्काळ कार्य करणे थांबवतील. वाय-फाय किंवा हॉटस्पॉटवरही ते चालणार नाहीत. यामुळे अनधिकृत वापराला आळा बसण्याची अपेक्षा आहे.

तेल विपणन कंपन्या दर महिन्याच्या पहिल्या दिवशी दरांचा आढावा घेतात. त्यामुळे १ मार्च रोजी LPG, CNG, PNG आणि एटीएफच्या किमतीत वाढ किंवा घट होऊ शकते. दरवाढ झाल्यास महागाईवर परिणाम होण्याची शक्यता आहे. काही बँका किमान शिल्लक अटी, बचत खात्यांचे नियम किंवा UPI व्यवहार मर्यादा बदलू शकतात. क्रेडिट कार्डवरील रिवॉर्ड पॉइंट्स आणि शुल्क संरचनेतही बदल होण्याची शक्यता आहे.

## कुनो राष्ट्रीय उद्यानातील चित्त्यांची संख्या ४८ वर

# बोत्सवाना हून ९ चित्ते भारतात दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्योपूर (मध्य प्रदेश) :** भारताच्या प्रतिष्ठित चित्त्यांच्या पुनरुज्जीवन उपक्रमाला मोठा पुढाकार मिळत असून आज सकाळी दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवानाहून आणलेली नऊ चित्ते सुरक्षितपणे कुनो राष्ट्रीय उद्यानमध्ये दाखल झाली आहेत. या नवीन आगमनानंतर भारतातील सर्व चित्त्यांची संख्या ४८ वर पोहोचली आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या तिसऱ्या लसीत ६ मादी आणि ३ नर चित्त्यांचा समावेश आहे. यांना बोत्सवानाहून भारतीय वायुसेनेच्या (IAF) विमानाने ग्वाल्हेर विमानतळावर आणले गेले आणि नंतर हेलिकॉप्टरच्या माध्यमातून कुनो राष्ट्रीय उद्यानात नेण्यात आले. येथील तयारीप्रमाणे नव्या चित्त्यांना प्रथम विशेष क्वारंटाइन कक्षांमध्ये सोडले गेले आहे, जिथे ते सुमारे एक महिना तज्ज्ञांच्या देखरेखीखाली राहतील.

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांच्या उपस्थितीत या चित्त्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले आणि ते पार्कमध्ये प्रवेशित केली गेले. या कार्यक्रमाबद्दल त्यांनी सांगितले की, या आगमनामुळे भारतातील चित्त्यांच्या पुनरुत्थान कार्यक्रमाला अधिक बळ मिळेल आणि दोन्ही लिंगातील संतुलन अधिक मजबूत होईल, ज्यामुळे पुढील प्रजननासाठी अनुकूल वातावरण तयार होणार आहे. 'प्रोजेक्ट चीता' अंतर्गत चालणाऱ्या या कार्यक्रमाची सुरुवात १७ सप्टेंबर २०२२ रोजी झाल्या होती, जेव्हा नामीबियाहून आठ चित्ते भारतात आणण्यात आली होती. २०२३ फेब्रुवारीमध्ये दक्षिण आफ्रिकेहून आणलेली बारा चित्ते योजनेचा दुसरा टप्पा होता. बोत्सवानाहून आलेली ही तिसरी तुकडी म्हणजे चार वर्षांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा आणखी एक मोठा टप्पा आहे. उपक्रमाचा मुख्य उद्देश भारतात जवळपास ७ दशकांपूर्वी विलुप्त झालेले चित्ते पुन्हा सक्रीय करणे आणि सशस्त्र, जास्तीची संख्या प्राप्त करून दीर्घकालीन व स्वयंनिर्भर प्राणी समुदाय उभारणे आहे. हे प्राणी जगातील सर्वात जलद धावणारे सस्तन प्राणी मानले जातात आणि त्यांच्या पुनर्स्थापनामुळे पारिस्थितिक संतुलनाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. चित्त्यांना क्वारंटाइन नंतर विस्तृत प्रदेशात सोडण्यापूर्वी त्यांच्या आरोग्य, अन्न सवयी आणि वातावरणाला अनुकूलतेचा तांत्रिक आढावा घेतला जाईल.

या काळात जीपीएस कॉलर लावून त्यांच्या हालचालींचे निरीक्षण करणेही नियोजित आहे. पारिस्थितिक तज्ज्ञांच्या मते, बोत्सवानाहून आणलेली विविध लिंगातील चित्त्यांची ही तुकडी आनुवंशिक वैविध्य सुधारण्यासही मदत करेल, ज्यामुळे भारतात चित्त्यांचा आधार आणि त्यांच्या प्रजनन शक्यता अधिक

# 'मेड इन भारत' म्हणजेच सर्वोत्तम ठरले पाहिजे!

### ब्रँड इनसाईटमध्ये सद्गुरूंचे उद्योगपतींना आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोयंबतूर :** ईशा योगा सेंटर येथे आयोजित तीन दिवसीय 'ब्रँड INSIGHT' नेतृत्व कार्यक्रमात योगी व आध्यात्मिक मार्गदर्शक सद्गुरू यांनी उद्योगपती आणि ब्रँड व्यवस्थापकांना स्पष्ट संदेश दिला—"'मेड इन भारत' म्हणजेच सर्वोत्तम, अशी ओळख निर्माण करा." राष्ट्राचा ब्रँड उंचावला तर प्रत्येक उद्योग आणि नागरिकाचा दर्जाही उंचावतो, असे ते म्हणाले.

१०० हून अधिक ब्रँड मॅनेजर्स, उद्योगमालक आणि सी-सूट अधिकाऱ्यांना संबोधित करताना सद्गुरूंनी भारताच्या जागतिक प्रतिमेतील सकारात्मक बदल अधोरेखित केला. "गेल्या काही वर्षांत भारतीय पासपोर्ट दाखवल्यावर मिळणारा आदर वाढला आहे. हेच ब्रँड बिल्डिंगचे सामर्थ्य आहे," असे सांगत त्यांनी भारताचा ब्रँड अधिक मोठ्या पातळीवर नेण्याची गरज व्यक्त केली. "भारताची प्रतिमा उंचावली, तर इतर सर्व भारतीय ब्रँड्ससाठी दारे आपोआप उघडतील," असे ते म्हणाले. योगासारख्या प्रभावी परंपरेचे उदाहरण देत त्यांनी नमूद केले की, त्याच्या कार्यक्षमतेइतके ब्रँडिंग झाले नाही. "ब्रँडिंग हा प्रभावीतेचा महत्त्वाचा भाग आहे. योगाचा जागतिक प्रभाव प्रचंड असला तरी त्याबद्दल पुरेशी जागरूकता निर्माण झाली नव्हती.

### पाकिस्तानविरोधात जागतिक निर्बंधांची हाक

**लखनौ :** अफगाणिस्तान–पाकिस्तान संघर्ष तीव्र होत असताना अफगाणिस्तानच्या माजी खासदार मरियम सोलेमानखिल यांनी भारताकडे निर्णायक भूमिकेची मागणी केली आहे. एएनआयला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी पाकिस्तानच्या दहशतवाद समर्थन व अण्वस्त्र धोरणाबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर कारवाई घडवून आणण्यासाठी भारत सक्षम असल्याचा विश्वास व्यक्त केला. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात एअर स्ट्राइक व सीमावर्ती कारवायांमुळे तणाव वाढला आहे.

## सोने तारण कर्जात झपाट्याने वाढ; एका वर्षात १२७% उसळी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतात सोन्याला पारंपरिक महत्त्व असून अडचणीच्या काळात ते आर्थिक आधार ठरते. ताज्या आकडेवारीनुसार देशात सोने तारण कर्जामध्ये मोठी वाढ झाली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये तब्बल २४,०६१ कोटी रुपयांचे नवीन सोने कर्ज वितरित झाले असून हा आकडा आश्चर्यकारक मानला जात आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक च्या मासिक अहवालानुसार, सोने तारण कर्जात वर्षभरात १२७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही वाढ ८५.५ टक्के आहे. ३१ मार्चपर्यंत या कर्जाची थकबाकी २,०६,२८२ कोटी रुपये होती. ती नोव्हेंबर २०२५ अखेर ३,५८,६४५ कोटींवर पोहोचली आणि ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ती वाढून ३,८२,७०६ कोटी झाली. यावरून सोने कर्ज आता केवळ मर्यादित वर्गापुरते न राहता सर्वसामान्यांसाठीही लोकप्रिय पर्याय बनल्याचे स्पष्ट होते.

तज्ज्ञांच्या मते, सोने तारण कर्ज वाढण्यामागे दोन प्रमुख कारणे आहेत. पहिले म्हणजे बँका आणि एनबीएफसी कंपन्या सोन्याची शुद्धता तपासून जलद कर्ज मंजूर करतात; कागदपत्रांची प्रक्रिया कमी असते आणि CIBIL स्कोअरची अट अनेकदा शिथिल असते. दुसरे म्हणजे २.५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी सोन्याच्या मूल्याच्या ८५ टक्क्यांपर्यंत रक्कम मिळते. तसेच या कर्जावरील व्याजदर क्रेडिट कार्डपेक्षा कमी असल्याने ग्राहकांचा ओढा वाढत आहे.

## सहारनपूरमध्ये भडकाऊ संदेशावरून गुन्हा दाखल; पोलिसांची तातडीची कारवाई, तपास सुरू

# 'हा रस्ता मुस्लीमांसाठी नाही'; दिल्ली-देहरादून एक्सप्रेसवेवर द्वेषपूर्ण ग्राफिटी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील सहारनपूर जिल्ह्यात दिल्ली-देहरादून एक्सप्रेसवेवर आक्षेपार्ह आणि सामुदायिक सलोखा बिघडविणारा संदेश लिहिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. "हा रस्ता मुस्लीमांसाठी नाही" असा द्वेषपूर्ण मजकूर राष्ट्रीय महामार्गावरील साऊंड बॅरियर भिंतीवर स्प्रे पेंटने लिहिण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकारानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने कारवाई करत अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. व्हिडिओमध्ये काही महिला भिंतीवर संदेश लिहिताना किंवा त्याचे चित्रण करताना दिसत आहेत. प्राथमिक तपासात या लिखाणाची जबाबदारी हिंदू रक्षा दल या संघटनेशी संबंधित काही व्यक्तींनी घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, घटनास्थळी उपस्थित असलेल्या व्यक्तींची अधिकृत ओळख अद्याप स्पष्ट करण्यात आलेली नाही.

या प्रकरणाची माहिती प्रथम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI)च्या कर्मचाऱ्याला मिळाली. त्यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार सहारनपूरमधील बिहारीगड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५३(२) अंतर्गत अज्ञात व्यक्तींविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

स्थानिक पोलीस अधीक्षक सागर जैन यांनी सांगितले की, या भडकाऊ संदेशामुळे कोणताही सार्वजनिक गोंधळ किंवा जातीय तणाव निर्माण होऊ नये यासाठी तातडीने भिंतीवरील मजकूर काळ्या रंगाने झाकण्यात आला आहे. तसेच, संबंधित व्यक्तींची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ही घटना सहारनपूर जिल्ह्यातील राजाजी भागाजवळ घडली असून, संबंधित रस्ता राष्ट्रीय महामार्ग ७२A चा भाग आहे. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारचा संदेश लिहिल्याने सामाजिक वातावरण बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सोशल मीडियावर या घटनेबाबत विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काहींनी या कृत्याचे समर्थन केले असले तरी, मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी याला द्वेषपूर्ण आणि समाजविघातक कृत्य ठरवले आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारचे भडकाऊ संदेश समाजात अविश्वास आणि वैमनस्य निर्माण करू शकतात.

पोलिसांनी ग्राफिटी हटवून शांतता राखण्याचा प्रयत्न केला असून तपासाची दिशा स्पष्ट करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज, व्हायरल व्हिडिओ आणि इतर पुराव्यांची पडताळणी सुरू आहे. आरोपींची लवकरच ओळख पटवून अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ही घटना समाजातील सलोखा टिकवण्यासाठी प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याची गरज अधोरेखित करत आहे.